नि.फौ.ख.क्र. १६७/२०२०.
निशाणी क्रमांक २९
सरकार वि. राहुल अंधारे

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची जबानी

मी प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | अनिल वैजिनाथ भोसले |
| वय | :– | ३८ वर्षे, |
| व्यवसाय | :– | ड्रायव्हर, |
| राहणार | :– | तपनेश्वर गल्ली, जामखेड ता. जामखेड जि.अ.नगर |

**साक्षीदाराचा सरतपास सरकार पक्षातर्फे श्री. डी.एल.नळवाडे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फतः**

**१.** दि.३/५/२०१९ रोजी जामखेड येथील गव्हाणे पोलीसाने मला जामखेड पो.स्टे. ला बोलाविले होते. तेथे माझ्यासमोर पांढ–या रंगावी वेरणा गाडी जिचा क्र. एम.एच.२४ ३२९९ ही गाडी राहुल अंधारे याच्याकडून जप्त करण्यात आली. त्याबाबतचा जप्ती पंचनामा माझ्यासमोर तयार करण्यात आला, तो वाचून दाखविण्यात आला, तो समजून मी त्यावर अनु.क्र. १ वर सही केली. त्यावेळी दुसरा पंच हनुमंत भानवसे हा हजर होता. आता मला तो जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३०** देण्यात येते. मी आरोपीस ओळखतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एच.टी.काशिद यांच्यामार्फत:-**

२. प्रश्न – पोलीस तुम्हाला बोलाविण्यासाठी कोठे आला होता?

उत्तरः मला पोलीसांनी फोन करुन बोलाविले होते.

हे म्हणणे खरे आहे की, गव्हाणे पोलीसाने फोन करुन बोलाविले असे पंचनाम्यात नमुद नाही. मला रात्री ९:१५ च्या दरम्यान पोलीसाचा फोन आला होता. त्यावेळी मी माझ्या तपनेश्वर गल्लीत होतो. हे मला माहिती नाही की, मला फोन आला त्यावेळी दुसरा पंच कोठे

होता किंवा कसे. दुस–या पंचाच कसे बोलाविले याची माहिती मला नाही. फोन आल्यानंतर १० मिनीटांनी मी पोलीस स्टेशनला गेलो. भानवसे नेमका किती वाजता आला हे मी सांगू शकत नाही. मी पंचनाम्यासाठी जाण्याच्या अगोदर गाडी तेथे हजर होती. हे म्हणणे खरे आहे की, मी जाणाच्या अगोदर गाडी कोणी आणलेली होती हे मी सांगू शकत नाही. जप्ती पंचनामा ९:३० च्या आसपास सुरु झाला व अंदाजे १० ते १०:३० वाजता तो समाप्त झाला.

प्रश्नः पंचनामा गाडीजवळ हाताने लिहिलेला नाही?

उत्तरः तो हाताने लिहिला व नंतर टाईप करुन घेतला.

३. हे म्हणणे खरे आहे की, तो पंचनामा कोणत्या पोलीसाने हाताने लिहिला व कोणी टंकलिखीत केला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, हाताने लिहिलेल्या पंचनाम्यावर मी सही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष हस्तलिखीत अथवा टंकलिखीत पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणाच्या अगोदरच पोलीसांनी पंचनामा टंकलिखीत करुन आणला होता व मी केवळ त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, उजेडात लिहिलेला पंचनामा हा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर चुकीचा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.08.10 17:42:21 +0530

**(यु.ए.भोसले )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०१),
**जामखेड**.

दिनांक:–१०/०८/२०२६
ठिकाण:– जामखेड